# पोलीस अधीक्षक,कार्यालय, उस्मानाबाद.

## " प्रेस नोट "

**वार :- गुरुवार**

**दिनांक :- ०८/११/२०१८**

---

**" मौजे येडशी येथे जमीन हडपण्याचे कारणावरुन ६० वर्षीय वृध्दास तलवारीने जिवे ठार मारले वरुन गुन्हा "**

पोलीस ठाणे उस्मानाबाद (ग्रामीण) :- दिनांक ०७/११/२०१८ रोजी ००.३० ते ०१.०० वा.सुमारास येडशी येथे राष्ट्रीय महामार्गाचे दक्षिण बाजुस फिर्यादीचे शेतात महेंद्र वामन नागटिळक , सोमनाथ रंगनाथ नागटिळक यांनी यातील मयत नामे भास्कर रंगनाथ नागटिळक वय ६० वर्ष रा. येडशी यास वरील नमुद इसमांनी संगणमत करुन मयताची शेत जमीन हडपण्याचे उद्देशाने महेंद्र वामन नागटिळक यास तुला एक लाख रुपये देतो त्याला संपवुन टाक असे म्हणुन दोघांनी मयतास तलवारीने जिवे ठार मारले व पुरावा नष्ट कण्याचे उद्देशाने रामलिंग डोंगरात प्रत टाकुन दिले व फिर्यादी नामे अश्विनी भास्कर नागटिळक वय २३ वर्ष रा. येडशी मयताची पत्नी हिचे गळयावर तलवार ठेवनु तु येडशी येथे यायचे नाही असे धमकी दिले वरुन कलम ३०२,२०१,३४१,५०६,३४ भा.द.वि सह कलम ४ / २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये वरील दोन इसमा विरुध्द गुन्हा दाखल असुन तपास पोलीस उप निरीक्षक, श्री. खांडेकर हे करीत आहेत.

**" उमरगा चौरस्ता येथे एकास मारहाण केलेवरुन गुन्हा "**

पोलीस ठाणे उमरगा :- दिनांक ६/११/२०१८ रोजी २३.३० वाजण्याचे सुमारास उमरगा चौरस्स्ता येथे बाळु मारुती बिराजदार रा. जकेकुर ता.उमरगा जि.उस्मानाबाद याने फिर्यादी नामे राजेसाब फत्तेखान शेख व्यवसाय ट्रक चालक रा. जकेकुर सध्या कसगी ता.उमरगा जि.उस्मानाबाद यांना त्यांची कांही चुक नसताना धक्काबुक्की व शिवगाळ करुन डोक्यावर मागील बाजुस काठीने मारुन दुखापत केली असल्याची फिर्याद दि.०७/११/२०१८ रोजी पो.स्टे. उमरगा येथे वरील नमुद इसमा विरुध्द कलम ३२४,३२३, ५०४, भा.द.वि प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ शिंदे हे करीत आहेत.

**" मौजे तिर्थ (खुर्द ) ता. तुळजापूर येथे मोटार सायकल चोरी "**

पोलीस ठाणे येरमाळा :- दिनांक ०१/११/२०१८ रोजीचे २३.३० ते दि.०५/११/२०१८ रोजीचे ०५.०० वा.दरम्यान आज्ञात चोरटयाने धनवंत गंगाधर पटाडे वय ३१ वर्ष व्यवसाय शेती रा. तिर्थ (खुर्द) ता.तुळजापूर यांची स्पेलंडर कंपनीची मोटार सायकल क्र.एम.एच.-१-बी-डब्ल्यु-८७९० घरा समोर व्यवस्थित हॅन्ल लॉक करुन लावलेली मोटार सायकल किंमत जुनी वारपी ३०,०००/- रु ची कोणीतरी आज्ञ ाज्ञत चोटरटयाने चोरुन नेली असल्याची फिर्याद धनवंत गंगाधर पटाडे रा. तिर्थ (खुर्द) ता.तुळजापूर यांनी

Scanned by CamScanner

दिनांक ०७/११/२०१८ रोजी पो.स्टे. तुळजापूर येथे फिर्याद दिल्याने आज्ञात चोरटे विरुध्द कलम ३७९ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन तपास पोना गलांडे हे करीत आहेत.

**" मोबाईल चोरी गुन्हा दाखल "**

पोलीस ठाणे उस्मानाबाद (शहर) :- दिनांक ०६/१०/२०१८ रोजी फिर्यादी नामे विमल एम अनबळगन रा. तामिलनाडुन ह.मु. देशमुख बिल्डींग सरस्वती शाळेच्या जवळ पोस्ट कॉलनी उस्मानाबद हे सरकारी दवाखाना उस्मानाबाद येथे मित्रास पाहण्यासाठी गेले असता त्यांनी त्यांचा मोबाईल १०० आर कंपनीचा काळया रंगाचा किंमत ५०००/- रु चा तसेच सुवर्णकार ठकाजी शिवाजी यांचा एच.टी.सी कंपनी चा मोबाई किंमत २६,५०० /- रु चा असे एकुण ३१,५०० रु चा चार्जिगसाठी लावला असता कोणीतरी आज्ञत चोटरयाने चोरु घेवुन गेले वरुन पो.स्टे उस्मानाबाद शहर येथे कलम ३७९ भा.द.वि प्रमाणे आज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा नोंद असुन तपास पोहेकॉ गाडे हे करीत आहेत.

**" मौजे ताकविकी ता. उस्मानाबाद येथे घरफोडी "**

पोलीस ठाणे बेंबळी :- दिनांक ०६/११/२०१८ रोजीचे २३.३० दि.०७/११/२०१८ रोजीचे ०४.०० वा.दरम्यान मौजे ताकविकी येथील फिर्यादी नामे बिराजसिंग विठ्ठलसिंग लोमर वय ४२ वर्ष व्यवसाय शेती रा. ताकविकी ता.जि.उस्मानाबाद यांचे घराचे दक्षिणेकडील लोखंडी दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी कपाट व लोखंडी तीन पेटीतील ६ ग्रामॅचे सोन्याचे झुंबर जोड, कानातील सोन्याच्या बुब्क्या, एक ग्रामॅच्या, कानातील लहान फुले एक जोड दोन ग्रामॅच्या, लक्ष्मीचे शिक्के असलेले सोन्याचे दोन नाणे असा एकुण एक तोळे सोन्याचे दागिने किंमत अंदाजे २०.०००/- रु व रोख रक्कम असा एकुण ४६,०००/- रु चा माल व एस.बी.आय बँकेचे सर्टिफिकेट,पासबुक, ए.टी.एम व आधारकार्ड सोने खरेदीया पावत्या कोणीतरी आज्ञात चोरटयांनी चोरुन घेवुन गेले वरुन पो.स्टे. बेंबळी येथे कलम ४५७,३८० भा.द.वि प्रमाणे आज्ञात चोरटया विरुध्द बिराजसिंग विठ्ठलसिंग लोमर वय ४२ रा. ताकविकी ता.जि.उस्मानाबाद यांचे फिर्याद वरुन गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ घुगे हे करत आहेत.

**" उमरगा येथे घरगुती कारणावरुन मारहाण केलेल्या व्यक्तीविरुध्द गुन्हा "**

**पोलीस ठाणे आनंद नगर :-** फिर्यादी नामे अतीक सादीक मुन्शी रा. गुंजोटी ता.उमरगा जि.उस्मानाबाद व त्याची पत्नी यांचेत फिर्यादीचे आई वडिलापासुन वेगळे राहण्याचे कारणावरुन २०१५ पासुन तक्रारी चालु आहेत. व कोर्टात केस चालु आहे. दि.०५/११/२०१८ रोजी नमुद फिर्यादी त्याचे गावातील हाजी मुन्वर देवाची यात्रा असल्याने व कंदुरी करायची असल्याने फिर्यादी मुलास आणण्यासाठी उमरगा येथे गेला असता १) बशीर मुल्ला (सासरा) २) इमरान बशीर मुल्ला (मेव्हुणा) व इतर तीन यांनी मुलास घेवुन जायचे नाही तुझा व मुलाशी व आमचीशी काहीएक संबंध नाही असे म्हणुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी व काठीने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटावर मारुन फ्रॅक्चर केले वरुन वरील नमुद इसमा विरुध्द कलम

Scanned by CamScanner

१४७,१४८,१४९,३२५,३२४,५०४ भा.द.वि प्रमाणे पो.स्टे. उमरगा येथे गुन्हा नोंद असुन तपास पोहकॉ अडसुळ हे करीत आहेत.

**" उस्मानाबाद येथे घरफोडी "**

पोलीस ठाणे आनंद नगर :- दिनांक ०८/११/२०१८ रोजीचे ०२.०० ते ०५.०० वा. दत्त कॉलनी काकडे प्लॉट येथे फिर्यादी नामे विकास दत्तु मगर रा.वाघोली ता.जि.उस्मानाबाद ह.मु. दत्त कॉलनी काकडे प्लाट उस्मानाबाद यांचे राहते घराचे बंद दरवाज्याचे कलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील कपाटात ठेवलेले अर्धा तोळे सोन्याचे फुले किंमत १०,०००/- रु व रोख रक्कम १३,०००/- रु असा एकुण २३,०००/- रु चा माल कोणीतरी आज्ञात चोरटयांनी चोरुन घेवुन गेले वरुन पो.स्टे. आनंद नगर येथे कलम ४५७,३८० भा.द.वि प्रमाणे आज्ञात चोरटया विरुध्द विकास दत्तु मगर रा.वाघोली ता.जि.उस्मानाबाद ह.मु. दत्त कॉलनी काकडे प्लाट उस्मानाबाद यांचे फिर्याद वरुन गुन्हा दाखल असुन तपास मसपोफौ समिंद्रे हे करीत आहेत.

पोलीस निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी,
उस्मानाबाद.

**टिप :- वर नमुद दाखल गुन्हयांचे अनुषंगाने ज्या नागरिकांना त्यांचेकडे तपासास उपयुक्त अशी माहिती असेल त्यांनी संबंधीत पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना सदरची माहिती पुरवुन तपासकामी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.**

Scanned by CamScanner